जा.क्र.पोआ/मिना बझार/ 311 /२०२५ सोलापुर शहर दि.२०.०३.२०२५

## जाहिरनामा

ज्याअर्थी सोलापुर शहरात विजापूर वेस परिसरात रमजान उत्सव सणानिमित्त दिंनाक २२/०३/२०२५ ते ३१/०३/२०२५ रोजी पर्यंत दररोज मिना बझार नावाने मोठा बाजार भरत आहे. शहरातील बेगम पेठ पोलीस चौकी, विजापूर वेस, बाराईमाम चौक, बाकळे प्रेस, पेंटर चौक, रंगरेज बोळ या परिसरात दुकाने व हॉटेल यांचा व्यवसाय असुन सदर दुकानामध्ये खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांची संख्या मोठी असते. वरील नमुद भागात मुस्लिम बांधवांची खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. सदर भागात वाहतूकीस अडथळा निर्माण होवून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता रमजान सणानिमित्त भरणाऱ्या मिना बाजार दरम्यान होणाऱ्या वाहतूकीस प्रतिबंध करणे आवश्यक असल्याची मला खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापुर शहर महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ३३ चे पोटकलम (१) व (ब) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

दि.२२.०३.२०२५ रोजीचे सकाळी ०८:०० वा. पासुन ते दि.३१.०३.२०२५ रोजीचे रात्रौ २४.०० वा. पर्यंत खालील नमूद मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना येण्यास-जाण्यास बंदी घालण्यात येत आहे.
(अपवाद :- पोलीस खात्याची वाहने, अत्यावश्यक सेवेची व पोलीस ज्या वाहनास परवानगी देतील अशी वाहने)

### वाहतूकीस बंद करण्यात आलेला मार्ग खालील प्रमाणे

१) बेगम पेठ पोलीस चौकी ते विजापूर वेस
२) बाराईमाम चौक ते विजापुर वेस
३) बाकळे प्रेस ते विजापुर वेस
४) लक्ष्मी मार्केट ते विजापुर वेस
५) पंचकट्टा ते विजापुर वेस
६) पेंटर चौक ते विजापुर वेस
७) रंगरेज बोळ ते विजापुर वेस
८) माणिक चौक ते विजापुर वेस

### वाहतूकीस पर्यायी मार्ग खालील प्रमाणे

१) माणिक चौक कडून समाचार चौक - भावसार पथ - बाराईमाम चौक - किडवाई चौक - हवाई चप्पल मार्ट चौक - ट्रेझरी बँक कॉर्नर - पंचकट्टा - लक्ष्मी मार्केट मार्गे दत्त चौक या मार्गांचा अवलंब करावा.

या जाहिरनाम्याअन्वये काढण्यात आलेला आदेश हा दि.२२.०३.२०२५ रोजीचे सकाळी ०८.०० वा. पासुन ते दि.३१.०३.२०२५ रोजीचे रात्रौ २४.०० वा. पर्यंत अंमलात राहील. सदर आदेशाचा भंग करणारा व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र होईल.

हा जाहिरनामा माझ्या सही व शिक्यानिशी प्रसिध्द केला आहे.

पोलीस आयुक्त, सोलापूर
सत्यमेव जयते

(एम. राज कुमार)
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर

प्रति,
सर्व संबंधित पोलीस ठाणे व शाखा प्रभारी अधिकारी, सोलापूर शहर.
सर्व सहायक पोलीस आयुक्त, सोलापूर शहर.
पोलीस उप-आयुक्त परिमंडळ, मुख्यालय, गुन्हे/विशा, सोलापुर शहर.

**प्रसिध्दी करिता -**
प्रभारी अधिकारी माहीती कक्ष, सोलापुर शहर.
२/- सदरचा जाहीरनामा हा सर्व वर्तमान पत्र/वृत्तवाहिनीवर प्रसिध्दी करावा.

Scanned with OKEN Scanner